**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०७ ची शपथेवर साक्ष**

मी देवाशपथ खरे सांगतो की :

माझे नावः गोविंद रघुनाथ मदने

वयः ५४ वर्षे, व्यवसायः सहा.फौ.पोलीस मुख्यालय अलिबाग

राहणारः अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

**विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एल. पवार रजेवर असल्यामुळे सरतपासणी साक्षीदार स्वतः**

०१. दि. २६/११/२०१९ मध्ये घटना घडली त्यावेळी मी रोहा पोलीस ठाण्यात सहा.फौ. म्हणुन कार्यरत होतो. गु.र.क्र. १०५/२०१९ प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० कलम ११ व सुधारीत अधिनियम १९९५ चे कलम ५ व ९ तसेच मोटारवाहन कायदा ६६/१९२ अन्वये आरोपी दानेश खान व इतर चौघांविरुध्द दाखल करण्यात आला होता. वरिष्ठांनी त्याचा तपास माझ्याकडे दिला.

०२. तपास आल्यानंतर मी गुन्ह्यात वापरलेला टेम्पो नोंदणी क्र. एम.एच. ०६ बी.जी. ३८८५ या वाहनाचा व त्यातील लहान मोठी ०५ जनावरांचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. आता मला दाखवलेला नि.क्र. २० वरील पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर टेम्पोतुन जनावरांना खाली उतरुन घेतले. टेम्पो व जनावरे पोलीस ठाण्यात जमा करुन त्याची **मुद्देमाल पावती** फाडली. आता मला दाखवलेली तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ३३** देण्यात येत आहे.

०३. जनावरांच्या चारा पाण्याची सोय होण्याकरीता त्या जनावरांना वावे दिवाळी गावातील गोशाळेत जमा केले. गौळवाडी व रोहा या दरम्यान असलेल्या घटनास्थळाचा मी पंचनामा केला. आता मला दाखवलेला सदर पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ३४** देण्यात येते.

पो.ना. जे. जे कुथे यांनी त्यावेळी घटनास्थळाचे फोटो काढले होते. ते फोटो त्यांनी स्वतः डेव्हलप करुन आणुन मला दिले. आता मला दाखवलेले सदर फोटोंची छायांकित प्रत तिच आहे. सदर फोटोच्या सत्यतेबाबत श्री. कुथे यांचे भा.पु.का. कलम ६५ ब अन्वये आवश्यक प्रमाणपत्र घेतले.

०४. मी साक्षीदारांचे जबाब घेतले. माझ्या तपासात आरोपींनी प्राण्यांना टेम्पोतुन नेऊन त्यांना निर्दयतेने वागणुक दिल्याचे निष्पन्न झाल्यामुळे मी त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. एकुण ०३ आरोपींपैकी एक विधीसंघर्षग्रस्त बालक असल्यामुळे मी केवळ आरोपी क्र. ०१ व ०२ विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आज रोजी ते न्यायकक्षात हजर नाहीत.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपी क्र. ०१ व २ तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. डी. एम. वर्मा यांच्यामार्फत सुरू...</u>**

०५. प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद मी स्वतः नोंदवुन घेतली होती. ती फिर्याद फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे बरोबर नोंदवुन घेतली होती. फिर्यादी अंकित याने त्याला त्याचा मित्र रोशन चाफेकर याने फोन करुन रोहा शहरातील गाई चोरीला जात आहेत असे सांगितले व तो त्याचा मित्र रितेश व रोशन असे सर्वजण हनुमान टेकडीच्या रस्त्याने त्या वाहनाचा पाठलाग केला व ते वाहन थांबविले तसेच त्यांनी दानेश खान यास गाई कोठे चालल्या आहेत या अनुषंगाने विचारना केली असा संपुर्ण मजकुर फिर्याद देताना सांगितला नव्हता. मी साक्षीदार क्र. ०३ रोशन याचा जबाब त्याच्या सांगण्याप्रमाणे बरोबर नोंदविला होता. त्याच्या उलटतपासातील परिच्छेद क्र. ०३ मधील नमुद संपुर्ण मजकुर जबाब देताना सांगितला नव्हता. मी साक्षीदार क्र. ०५ विशाल याचा जबाब त्याच्या सांगण्याप्रमाणे बरोबर नोंदविला होता. त्याने जबाब देतेवेळी त्याचा मित्र मयुर कोंडे त्याच्यासोबत होता असे जबाब देताना सांगितला नव्हते. मी साक्षीदार क्र. ०६

नितेश याचा जबाब त्याच्या सांगण्याप्रमाणे बरोबर नोंदविला होता. त्याच्या उलटतपासातील परिच्छेद क्र. ०३ मधील नमुद संपुर्ण मजकुर जबाब देताना त्याने सांगितला नव्हता.

०६. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पोलीस ठाण्यापासुन ०१ कि.मी अंतरावर आहे. पोलीस ठाण्यातुन तेथे जाण्यास १० ते १५ मिनीटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या पुढे गौळवाडी गावाची वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्याच्या आजुबाजुला लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अगोदरच तयार केलेल्या पंचनाम्यावर माझ्या मर्जीतल्या लोकांची पंच म्हणुन सही घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, पटलावर जनावरांना पशु वैद्यकीय अधिकारी यांनी तपासल्याचे पत्र नाही. मी आरोपींकडे आवश्यक परवाना आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी त्यांना पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, जनावरांच्या कानावर त्यांच्या नोंदणीचा क्रमांक असतो. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः आरोपींना गुरे वाहताना पकडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, टेम्पो पोलीस ठाण्यात आणला गेला त्यावेळी अंदाजे १०० लोकांचा जमाव सोबत होता. हे म्हणणे खरे नाही की, जमावाच्या दबावाखाली खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखत असल्याचे खोटे सांगत आहे तसेच खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2025.10.15 18:48:56 +1100

स्थळ : रोहा.
(एस. व्ही. खैरे)

दि.१५.१०.२०२५
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.